**दिवाणी किरकोळ अर्ज क. 01/2018**
**प्रयागबाई नरहरी पवार मयत वगैरे वि. कोणीही नाही**

## आदेश निशाणी क. 1 वर

मयत नरहरी ग्यानबा पवार यांचे अर्जदार हे वारस आहेत. अर्जदार क. 2 ते 4 हे मयत नरहरी यांची मुले आहेत. मयत नरहरी ग्यानबा पवार यांचा मृत्यू दिनांक 8.7.2015 रोजी गरसुळी, ता. रेणापुर, जि. लातुर येथे झालेला आहे. त्याप्रमाणे मृत्यू दाखला नि.क. 16 प्रमाणे रेकॉर्डवर आहे. अर्जदार क. 2 ते 4 यांची आई प्रयागबाई नरहरी पवार म्हणजेच अर्जदार क. 1 या प्रस्तुत प्रकरण प्रलंबित असताना दिनांक 18.2.2018 रोजी मयत झाल्या आहेत. अर्जदार क. 2 ते 4 व मयत प्रयागबाई हे मयत नरहरी यांच्या कुटूंबातील सदस्य आहेत असे प्रमाणपत्र सरपंच, गरसुळी ग्रामपंचायत यांनी नि.क. 17 प्रमाणे रेकॉर्डवर दाखल आहे.

2. प्रकरणामध्ये सायटेशन नोटीसची बजावणी नि.क. 8 नूसार करण्यात आलेली आहे. दिनांक 11.1.2018 रोजीच्या दैनिक एकमत या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटिस देवून आक्षेप मागविण्यात आले. मात्र आज रोजी पर्यंत कोणाचेही आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

3. अर्जदार विष्णु यांचे साक्षीदार क. 3 यांनी नि.क. 13 प्रमाणे त्यांची शपथेवर साक्ष न्यायालयासमोर नोंदविलेली आहे. त्यामध्ये त्यांनी नि.क. 1 प्रमाणेचा सर्व मजकूर कथन केलेला आहे.

4. अर्जदार विष्णु यांचे साक्षीदार क. 3 यांनी त्यांचे सरतपासात मयत नरहरी यांना अर्जदार क. 2 ते 4 हे वर्ग 1 चे वारस आहेत असे नमूद केलेले आहे. सायटेशन नोटिस व वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटिस देवूनही आज रोजीपर्यंत कोणाचेही आक्षेप प्राप्त झालेले नाहीत. प्रथमदर्शनी अर्जदार क. 2 ते 4 हे मयत नरहरी यांचे वर्ग एक चे वारस आहेत असे दिसून येते. त्यामुळे विष्णु अर्जदार यांचे साक्षीदार क. 3 यांनी न्यायालयासमोर शपथेवर दिलेल्या साक्षीवर विश्वास ठेवणे योग्य राहिल.

त्यानूसार मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आ दे श</u>**

1. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
2. योग्य ती कोर्ट फीस भरल्यानंतर मयत नरहरी ग्यानबा पवार यांचे अर्जदार क्र. 2 ते 4 हे  वारस आहेत असे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**दिनांक 05.03.2018**

**( श्रीकृष्ण ह. इनामदार )**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रेणापूर**